


**भाईंदर :** अदाणी इलेक्ट्रिसिटीद्वारे रक्तदान शिबिर राबवण्यात आले.

# अदाणी इलेक्ट्रिसिटीच्यावतीने मिरा-भाईंदरमध्ये रक्तदान शिबिर

भाईंदर (बातमीदार) : अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडच्या भाईंदर कार्यालय येथे राज्य रक्त संक्रमण परिषद आणि अदानी फाउंडेशनच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्याचा समारोप शुक्रवारी झाला. कोरोना काळात मुंबईतील रक्ताचा तीव्र तुटवडा लक्षात घेता अदाणी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडने त्यांच्या कर्मचाऱ्यांना पुढाकार घेत आवश्यकतेसाठी रक्तदान करण्याचे आवाहन केले. याबद्दल बोलताना एईएमएलकडून सांगण्यात आले, की सध्याच्या अवघड काळात मुंबई शहरामध्ये रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. आमच्या कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेत त्यांच्या कुटुंबासोबत रक्तदान केले आहे.